




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आतील पानात**

- महागाईच्या झळा गोर-गरीब जनतेला...
- गड- किल्ल्यांच्या रक्षणासाठी खा. निलेश लंके यांचे कृतीशील पाऊल...
- कुणबी ओबीसींच्या आरक्षणात पुढारलेल्या मराठा जातीची घुसखोरी थांबवा...


वर्ष : ०५ | अंक : ३२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१६ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056







# नाशिक गँगवॉर! राहुल धोत्रे हत्याकांड !!

## भाजपचे माजी नगरसेवक उद्धव निमसे पोलिसांना सरेंडर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, नाशिक :** राहुल धोत्रे हत्याकांड प्रकरणी महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. भाजपचे माजी नगरसेवक उद्धव निमसे हे पोलिसांना शरण आले आहेत. या प्रकरणात उद्धव निमसे यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल झाला होता. गेल्या म हिन्यात पोळ्याच्या दिवशी धोत्रे आणि निमसे अशा दोन गटात हाणामारी झाली होती. यामध्ये राहुल धोत्रे हा युवक गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले. पण सात ते आठ दिवसांत उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी उद्धव निमसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

उद्धव निमसे यांना सुरुवातीला जिल्हा न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. पण खूनाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयाने जामीनचा अर्ज फेटाळला होता. यानंतर उद्धव निमसे गेल्या २० दिवसांपासून फरार होते. यानंतर ते आज



अचानक पोलिसांना शरण आले आहेत. उद्धव निमसे यांना उद्या कोर्टात हजर केलं जाईल. त्यावेळी पोलीस त्यांची बाजू न्यायालयात मांडतील.

**नेमकं प्रकरण काय?**

संबंधित प्रकरण गेल्या महिन्यातील २२ ऑगस्टची आहे. या दिवशी बैलपोळा होता. नाशिकच्या जनार्दननगर दिंडमेळ्याच्या परिसरात गाडीचा कट लागल्यावरुन दोन जणांमध्ये किरकोळ वाद झाला. हा वाद इतका वाढला की त्यांच्यात हाणामारी झाली आणि नंतर त्याचं रुपांतर थेट टोळीयुद्धात झालं.

धोत्रे आणि निमसे टोळी यांच्यात मोठा संघर्ष झाला. या टोळीयुद्धात राहुल धोत्रे आणि अजय कुसाळकर हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले होते. दोघांवर रुग्णालयात उपचार सुरु होते. पण उपचारादरम्यान राहुल धोत्रे या तरुणाचा मृत्यू झाला.

या घटनेप्रकरणी नाशिक जिल्ह्यातील आडगाव पोलिसांनी संशयितांविरुद्ध खूनाचा गुन्हादेखील दाखल केला होता. या प्रकरणात संशयित उद्धव निमसे यांना न्यायालयाने जामीन फेटाळला होता. पोलीस त्यांचा शोध घेत होते. तर दुसरीकडे घटना घडून २० दिवस उलटले तरी पोलिसांनी निमसे यांना अटक केली नाही म्हणून नागरिकांना मोर्चा काढून अटकेची मागणी केली होती.

मनसे आणि ठाकरे गटाच्या नाशिकमध्ये निघालेल्या मोर्चातही याबाबत मागणी करण्यात आली होती. या दरम्यान पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली होती. त्यांनी आपण या गुन्ह्यात सहभागी असल्याचं चौकशीत कबूल केलं होतं. त्यानंतर पोलीस निमसे यांचा शोध घेत होते. अखेर उद्धव निमसे हे आज स्वत:हून पोलिसांना शरण आले आहेत.

## ठाण्यात भर पावसातंही पाणीबाणी... पाणी जपून वापरण्याचे आदेश...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, ठाणे :** ठाणे शहरात जल शुद्धीकरणाच्या कारणाने शहरातील काही भागात पाणीकपात करण्यात आली आहे. पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत जांभूळ जलशुध्दीकरण केंद्रातील वाहिन्यांचे तपासणीसाठी शहराच्या काही भागात पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

दरम्यान जलशुध्दीकरण केंद्रातील कामामुळे पाणीपुरवठा बंद राहणार असल्याचे पालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत जांभूळ जलशुध्दीकरण केंद्रातील जलाशय येथे बारवी गुरुत्व वाहिनी क्र. १. २ व ३ वर वाहिन्यांचे उन्नतीकरण व तातडीने देखभाल करण्यासाठी शटडाऊन घेण्यात येणार आहे. त्यामुळे, ठाणे महापालिका क्षेत्रातील कळवा, मुंब्रा, दिवा यांच्यासह वागळे आणि माजिवडा-मानपाडा प्रभाग समितींचा काही भाग येथे शुक्रवार, १९ सप्टेंबर रोजी पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

**पुढील भागातील पाणीपुरवठा राहणार बंद..**

बारवी गुरुत्व वाहिनी क्र. १. २ व ३ वर वाहिन्यांचे उन्नतीकरण व तातडीने देखभाल करण्याकरीता गुरुवार, १८ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजल्यापासून शुक्रवार, १९ सप्टेंबर रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत एकूण २४ तास पाणी पुरवठा बंद राहील. त्यामुळे, ठाणे महानगरपालिके अंतर्गत दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. २६ व ३१ चा काही भाग वगळता) आणि कळवा प्रभाग समिती मधील सर्व भागामध्ये, तसेच, वागळे प्रभाग समिती मधील रुपादेवी पाडा, किसननगर नं. २. नेहरुनगर तसेच मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणी पुरवठा २४ तासासाठी पूर्णपणे बंद राहील.पाणी पुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होईल. या कपातीच्या कालावधीत पाणी काटकसरीने वापरावे. तसेच, पाणी गाळून व उकळून प्यावे, असे आवाहन ठाणे महापालिकेने नागरीकांना केले आहे.

## अतिवृष्टीने जिल्ह्याला झोडपले; नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

### खा.सोनवणे यांचे पालकमंत्री अजित पवार यांना पत्र



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१५, बीड :**

दि.१४ आणि १५ सप्टेंबर रोजी रात्री असे सलग दोन दिवस बीड जिल्ह्यावाशीयांना अतिवृष्टीने झोडपले आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व नद्या दुथडी भरून वाहत आहेत. परिणामी, शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक भागात पिके पाण्यात असून काही ठिकाणी नदीपात्राशेजारील जमीनी देखील खरडून गेल्या आहेत. शिवाय घरांची देखील पडझड झालेली असून नुकसानीचे तातडीने पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.

पालकंत्री पवार यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, बीड जिल्ह्यात सलग पावसामुळे अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सकाळी सात वाजल्यापासून स्वत: परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कडा गावातील ११, चोभा निमगावातील १४, घाटा पिंपरीतील ७, पिंपरखेडातील ६, धानोऱ्यातील ३ व डोंगरगणमधील ३ नागरिक असे मिळून ४४ लोक अडकलेले होते. याच बरोबर जिल्ह्यातील बीड तालुक्यातील नाळवंडी, नेकनूर, येळंबघाट, आष्टी तालुक्यातील दौलावडगाव, धानोरा, कडा, पिंपळा, टाकळसिंग, दादेगाव, अंबाजोगाई तालुक्यातील लोखंडी, पाटोदा, केजमधील केज, यूसूफ, होळ, शिरूर तालुक्यातील शिरूर महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद आहे. आष्टी तालुक्यात तर कडा आणि परिसरात ढगफ ुटीसदृस्य पाऊस झालेला आहे. कधी नव्हे ते नदीला मोठा पुर आला. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होत. तर अनेक भागात मुसळधार पावसामुळे विविध नद्यांच्या पाण्याने पात्र ओलांडल्याने शेतात पाणी शिरल आहे. शिवाय जमीन खरडून गेल्या आहेत. यामुळे पिकांचे आणि शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. याच बरोबर काही भागात घरांची पडझड देखील झाली आहे. आष्टी तालुक्यात पुराचे पाणी घरात घुसून संसारोपयोगी साहित्याचेही नुकसान झाले आहे. यामुळे शासनाने तातडीने स्पॉटवर जावून पंचनामे करावेत, व सरसकट नुकसान भरपाई द्यावी, असे पत्रात म्हटले आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्याला पावसाने झोडपले; २१ मंडलात अतिवृष्टी !!

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** जिल्ह्याला रात्री पुन्हा एकदा पावसाने झोडपून काढले. जिल्ह्याच्या उत्तर भागापेक्षा दक्षिणेत पावसाचे प्रमाण अधिक होते. रात्रीच्या पावसाने शेवगाव, पाथर्डी, कर्जत, जामखेड व नेवासे तालुके जलमय झाले. या तालुक्यातील एकूण २१ मंडळात अतिवृष्टी झाली. शेवगाव व नेवासे तालुक्यातील अनेक घरांतून पुराचे पाणी शिरून नागरिकांच्या संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले. दरम्यान, हवामान खात्याने जिल्ह्यास उद्या सोमवारी व परवा मंगळवारी पुन्हा एकदा पावसाचा ‘येलो अलर्ट’ जारी केला आहे. मुळा धरण (९९.६७ टक्के-२५९२६ दलघफू) भरल्याने धरणातून आज रविवारी दुपारी ५०० क्युसेक्स पाणी सोडण्यात येऊ लागले आहे. टप्प्याटप्प्याने त्यात वाढ होणार असल्याने मुळा नदीकाठच्या गावांना जलसंपदा विभागाने सावधानतेचा इशारा दिला आहे. जिल्ह्यात रात्री सर्वदूर पाऊस झाला. दुपारी सुरू झालेला पाऊस पहाटेपर्यंत कमी-अधिक स्वरूपात सुरूच होता. आजही हवामान विभागाने जारी केला होता. मात्र, अत्यंत तुरळक स्वरूपाचा पाऊस झाला. पावसाने खरीप पिकांनाही फटका बसला आहे. सलाबतपूर मंडलात (ता. नेवासे) १४९ तर राशीन (ता. नेवासे) मंडलात १४२ मिमी पाऊस झाला. शेवगावमधील ७, पाथर्डीतील ७, कर्जतमधील ५, नेवासे व जामखेडमधील प्रत्येकी एका मंडळात अतिवृष्टी झाली.

**ही मंडले पुढीलप्रमाणे**



**(आकडे मिमीमध्ये)** - कर्जत ७९, माहिजळगाव ६८, अरणगाव ६८, शेवगाव ७३.५, बोधेगाव १०२, अरणगाव ६८, शेवगाव ७३.५, बोधेगाव १०२, चापडगाव १०२, ढेरजळगाव ६७, केरळगाव ८०.३, दहिगावने ८०.३, मुंगी ८८.३, पाथर्डी ६७, माणिकदौडी ६७, टाकळी ८७.५, कोरडगाव ८६.८,मिरी ६६.८, खरवंडी ८७.५, अकोले ८६.३.

**तालुकानिहाय झालेला पाऊस**

नगर ३०.१, पारनेर १८.१, श्रीगोंदा २१.१, पाथर्डी ७२.४, नेवासा ४२.७, कर्जत ६८.६, जामखेड ३७.४, शेवगाव १५.४, अकोले १०.५, कोपरगाव ६.५ व श्रीरामपूर ३६.९ मिमी.

## अहिल्यानगरच्या शेवगाव -पाथर्डीत आभाळ फाटलं !

### अमराई नदीला शंभर वर्षानंतर मोठा पूर ! अनेक गावांचा संपर्क तुटला...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरासह जिल्हा सर्वत्र जोरदार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान पाथर्डी तालुक्यात सोमवारी मध्यरात्रीनंतर झालेल्या ढगफुटीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. रात्री तीनच्या सुमारास पावसाने अचानक जोर धरला. विशेषतः तालुक्याच्या पश्चिम भागात अनेक तास मुसळधार पाऊस कोसळत राहिला असून पूरस्थिती निर्माण झाल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक भागात मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. तीन दिवसापासून पाऊस सुरू आहे. नदी नाल्यांना मोठ्या प्रमाणात पाणी आले आहे. विशेषतः शेवगाव, पाथर्डी तालुक्यातील काही भागांमध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे. या अतिवृष्टीमुळे करंजी, मढीसह अनेक गावांचा संपर्क पूर्णपणे तुटला असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे




लागत आहे. अनेक ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने लोकांनी झाडांवर आसरा घेतला. जनावरे पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

**अनेक महामार्गावरील वाहतूक ठप्प**

राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग, बारामती-छत्रपती संभाजीनगर राज्य महामार्ग तसेच पाथर्डी-बीड राज्य महामार्गावरील पुलांवरून पाणी वाहत असल्याने हे मार्ग बंद करण्यात आले आहेत. यामुळे बराच वेळ या महामार्गावरील वाहतूक बंद झाली होती. तर आता काही ठिकाणची वाहतूक सकाळी हळूहळू सुरू झाली आहे.

# संपादकीय



## विद्यापीठाच्या नावानं धुमशान

मविप्रचे विद्यापीठ स्थापन करण्याच्या कार्यकारी मंडळाच्या निर्णयाने जिल्हा ढवळून निघाला आहे. वास्तविक, कर्मवीरांनी उभारलेल्या या संस्थेची – वाटचाल गौरवशाली राहिली आहे. – संस्थेचे विद्यापीठ अस्तित्वात येईल किंवा कदाचित येणारही नाही; परंतु शतकोत्तर संस्थेची प्रतिष्ठा धुळीस – मिळेल वा तिच्या लौकिकास धक्का पोहोचेल, असे वर्तन होता कामा नये. या मुद्द्यावर पक्षीय मतभेद संस्थेसाठी नक्कीच हितकारक नाहीत.

एकशे अकरा वर्षांची देदीप्यमान कारकीर्द असलेल्या नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज शिक्षण संस्थेच्या निवडणुकीला अद्याप बराच अवकाश असला, तरी आतापासूनच निवडणूकसदृश वातावरणाची प्रचीती येते आहे.

२०२२ मध्ये संस्थेची निवडणूक पार पडल्यानंतर कुरबुरीच्या किरकोळ घटनांचा अपवाद वगळता सुरुवातीची तीन वर्षे संस्थेचा कारभार शांततेत चालला. 'नवी विटी, नवे राज्य' असल्याने विरोधी गटानेही सभासदांचा कौल मान्य करून शांत राहणे पसंत केले. अर्थात, त्यांच्यापुढे दुसरा पर्यायही नव्हता. आता मात्र विद्यमान सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील कार्यकारिणीने खासगी विद्यापीठ स्थापन करण्याच्या घेतलेल्या निर्णयाविरुद्ध विरोधकांनी रान उठविल्याने आज (१४ सप्टेंबर) होणाऱ्या बहुप्रतीक्षित सर्वसाधारण सभेचा थेट आखाडाच होतो की काय, अशी अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. विरोधी गटाकडून विद्यापीठ निर्मितीच्या फैसल्याविरोधात हरकतींचे अभियान राबविण्यात आले. खरे तर समाजकेंद्री संस्थेत हाच लोकशाही मार्ग असल्याने त्यात गैर काहीच नाही. प्रत्येक सभासद व संस्थेशी संबंधित घटकांच्या शंकांचे निरसन होण्याची परंपरा पाळली जायलाच हवी. खासगी विद्यापीठ हा विषय घटनेच्या चौकटीत न बसणारा आणि बेकायदेशीर असल्याचा दावा करून विरोधी गटाने आपलेच पारडे जड असल्याचे दाखवून देण्याचा पुरेपूर प्रयत्न केल्याचे दिसते. मागील निवडणुकीत तब्बल वीस वर्षांनंतर संस्थेत सत्तांतर झाले. नीलिमा पवार यांच्या सत्तारूढ गटाविरोधात लाट निर्माण होऊन त्यांचा धुव्वा उडाला. त्यांचे एकमेव उमेदवार डॉ. सुनील ढिकले अध्यक्षपदी निवडून आले. तीन वर्षे संस्थेच्या कारभारात सक्रिय असलेल्या ढिकलेंनी गेल्या महिन्यात अचानक पत्रक प्रसिद्धीस देऊन खासगी विद्यापीठ स्थापन करण्याच्या निर्णयाविरोधात मोहीम उघडली. खरे तर मागील जुलै महिन्यात कार्यकारी मंडळाच्या बैठकीत स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्याबाबत प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्यानंतर महाराष्ट्रातील अशा काही विद्यापीठांचा अभ्यास दौरा करून कौल घेण्याचे ठरविण्यात आले.

संचालक आणि पदाधिकाऱ्यांनी पुणे येथील काही संस्थांना भेटीही दिल्या. मात्र, कार्यकारिणीने ज्या चार विद्यापीठांची पाहणी केली, त्या कुटुंबकेंद्रित आणि एकाधिकारशाहीने चालविणाऱ्या संस्था असल्याचा आरोप करून डॉ. ढिकले यांनी खळबळ उडवून दिली. वास्तविक, तेव्हाच संस्थेची येणारी सर्वसाधारण सभा या विषयावरून वादळी ठरणार असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतर जसजशी १४ सप्टेंबर ही सभेची तारीख जवळ येत गेली, तसे विरोधकांनी वातावरण तापवले. परवा पत्रकार परिषदेला माजी सरचिटणीस नीलिमा पवार यांच्यासह डॉ. सुनील ढिकले, माजी अध्यक्ष अरविंद कारे, माजी सभापती माणिकराव बोरस्ते, माजी संचालक मोहन पिंगळे, दिलीप मोरे, बाळासाहेब कोल्हे आदींनी उपस्थित राहून विद्यापीठाला विरोध असल्याची ठाम भूमिका मांडली.

# महागाईच्या झळा गोर-गरीब जनतेला...!

रिटेल इन्फ्लेशन म्हणजे किरकोळ महागाईचा दर गेले नऊ महिने सातत्याने घसरत होता आणि लोकांनाही हायसे वाटले होते. पण ऑगस्टमध्ये किरकोळ महागाईच्या दरात वाढ झाली आहे आणि हा दर १.६१ टक्के इतका झाला आहे. हा दर किरकोळ वाटू शकतो, पण सध्या जनता ज्या महागाईच्या वणव्यात होरपळत आहे ते पाहता हा दर खूप जास्त आहे. सामान्यतः महागाईचा दर वाढला आहे ते हिरव्या भाज्या आणि मासे तसेच अंडी या आवश्यक वस्तूंच्या किमतीतील वाढीमुळे. नोव्हेंबर २०२४ पासून महागाईचा दर सतत कमी होत होता. पण ऑगस्ट २०२५ मध्ये मात्र अचानक तो वाढला. त्याला कारणे अर्थातच अर्थशास्त्रीय आहेत. आधीच्या उच्च बेस इफेक्टचा परिणाम कमी झाल्यामुळे ही वाढ नोंदवली गेली असा अर्थशास्त्रीय निष्कर्ष आहे, पण सर्वसामान्यांच्या भाषेत सांगायचे तर जनता अगोदरच महागाईने मेटाकुटीला आली होती, त्यात आता या किरकोळ महागाईमुळे ती जेरीस आली आहे. बेस इफक्ट म्हणजे अगोदरच्या वर्षांपेक्षा या वर्षीत किती किमती बदलल्या आहेत आणि त्या निकषावर महागाईचा फटका जास्त बसत आहे. महागाई चार टक्क्यांवर ठेवण्याचे उद्दिष्ट रिझर्व्ह बँकेला देण्यात आले होते. त्या निकषानुसार पाहिले असता हा महागाईचा दर सामान्यतः आटोक्यात आहे. पण जनतेला या विश्लेषणाची सवय नसते आणि तिला महागाईचे कारण काय याच्या कारणातही काहीही रस नसतो. त्यांना रस असतो तो महागाई किती आहे आणि कोणती स्वस्त वस्तू आहे आणि कोणती महाग आहे यातच. त्या दृष्टीने निश्चितच हा दर चिंताजनक आहे.



यंदा पावसामुळे कित्येक धान्ये सडून गेली आहेत आणि कित्येक पिकं तर येण्याची शक्यताच दिसत नाही. या परिस्थितीत धान्य महागाई काही प्रमाणात का होईना पण वाढली आहे. मोदी सरकारसाठी ही भूषणावह बाब नाही. कारण मोदी यांनी सबका साथ सबका विकास असा नारा दिला होता आणि त्यामुळे ते सत्तेवर येताच जनतेला हायसे वाटले होते. काँग्रेसच्या काळात महागाईने कहर केला होता आणि साध्या गोष्टी जनतेच्या आवाक्याबाहेर गेल्या होत्या. मोदी सरकार सत्तेवर येताच जनतेला 'अच्छे दिन' आल्याची खात्री पटली होती. पण अचानक महागाईच्या दरात किरकोळ का होईना पण वाढ झाल्याचे दिसल्याने जनता त्रस्त आहे. त्यातच आगीत तेल ओतणारे विरोधक विशेष म्हणजे राहुल गांधी यांच्यासारखे विरोधक काँग्रेसचे नेते आणि शिवसेना उबाठाचे नेते याचा गैरफायदा घेणार यात काही शंका नाही. महागाईने अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो हे पाहिले असता असे लक्षात येते की महागाई ही बाजारात पैसा जास्त प्रमाणात आल्याने वाढते आणि पैसा कमी असल्यानेही वाढते. बाजारात पैसा जास्त झाला तर लोक हवी ती वस्तू मागेल त्या किमतीला खरेदी करतात आणि परिणामी महागाई वाढते. मोदी सरकार महागाईच्या बाबतीत पारदर्शक आहे आणि त्याने आकड्यांची कसलीही लपवालपवी केली नाही. ती काँग्रेसच्या काळात केली जायची. काँग्रेसने जो आरोप केला आहे, की गेल्या दहा वर्षांच्या काळात सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे महागाईमध्ये सातत्याने भर पडली आहे. ती लोकांच्या रोषातून का व्यक्त होत नाही. कारण काँग्रेस खोटे बोलत आहे. जनता जर महागाईने त्रस्त असती तर मोदी सरकार कधीच उलथून पडले असते. पण जनता खुष आहे. त्यामुळे काँग्रेसचा दावा तकलादू आहे. पण हे निश्चित आहे की आता सणासुदीचे दिवस आहेत आणि त्यांच्या तोंडावर महागाईचा दणका जनतेला बसला आहे, खास करून भाज्या आणि अंडी वगैरेची दरवाढ तर असह्य आहे. मोदी सरकार यातून काही तरी उपाययोजना काढेल यात काही शंका नाही. पण ग्राहक किंमत निर्देशांकात सतत नऊ महिने घसरणीनंतर ही वाढ झाली आहे. याचा परिणाम म्हणजे ऐन सणासुदीत अनेक वस्तूंच्या विशेष करून खाद्य पदार्थांच्या किमती वाढू शकतात. त्यामुळे ही वाढ चिंताजनक तर आहेच. यावर उपाय म्हणजे सरकारने त्वरित काही तरी तोडगा काढून सर्वसामान्य जनतेला दिलासा द्यावा ही मागणी रास्त आहे. आर्थिक बाबतीत आपले अज्ञान असल्यामुळे महागाई वाढली की सरकारच्या नावाने बोंब ठोकायची अशी विरोधकांना सवय झाली आहे. ही महागाई सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे झालेली नाही. कारण या महागाईमुळे ग्राहकांसाठी वस्तूंच्या किमती आणि विशेष करून अन्नपदार्थांच्या किमती वाढू शकतात. हा परिणाम फारच नकारात्मक आहे आणि तो जास्त घातक आहे. १९९६ मध्ये दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत कांद्यांचे भाव चढले होते आणि त्यात सुषमा स्वराज सरकार याची आहुती पडली होती. तसे आता होणार नाही. पण मोदी सरकारने किरकोळही धोका पत्करण्याची तयारी दाखवू नये. कारण या किरकोळ महागाईमुळे रिझर्व्ह बँकेच्या धोरणात बदल होणार नसला तरीही जनतेला महागाईने पिडले आहे हे वास्तव नाकारून चालणार नाही. तेव्हा महागाईवर सामान्य जनतेला दिलासा देण्याचा विचार तर सरकारने करायलाच हवा. हवामान बदलाचा परिणाम महागाईवर जाणवतो आणि त्याचाच फटका जनतेला बसला आहे. ग्राहकाना विशिष्ट वस्तूसाठी अधिक किमतीचा सामना करावा लागेल. कॅस्केडिंग इफेक्ट म्हणतात तो म्हणजे या किंमत वाढीचा परिणाम इतर वस्तूंच्या किमतीवरही होईल आणि ग्राहकांना त्याचे जास्त दाम मोजावे लागतील. आरबीआयच्या चार टक्क्यांच्या लक्ष्यापेक्षा ही वाढ कमी असली तरीही ऐन सणासुदीच्या काळात अन्नधान्य आणि भाज्या यांच्या किमतीत वाढ होणे हे चिंताजनक आहे. सारांश काय तर सरकारला यावर काही तरी तातडीचा उपाय शोधणे आवश्यक झाले आहे. आता मोठ्या निवडणुका नसल्या तरीही

जनतेच्या कल्याणासाठी सरकारने काम करायला हवे आणि तसे ते जनतेला दिसायला हवे. त्यानुसार महाराष्ट्र आणि मोदी सरकारे वागतील अशी आशा आहे. कोणतेही सरकार नेहमीच लोकांच्या रडारवर असते आणि त्यानुसार मोदी सरकार असणार. पण तसे होऊ न देण्याची खबरदारी मोदी सरकारने घ्यायला हवी. कारण मोदी यांनी अच्छे दिन आणण्याची ग्वाही दिली होती. ती त्यांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.



**कव्हर स्टोरी**
- शिवाजी विठ्ठल चौगुले.
कागल-कोल्हापूर..

# राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१५, ठाणे :** गुजरात राज्याचे राज्यपाल असलेले आचार्य देवव्रत यांनी आज महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेतली. राजभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपाल पदाची शपथ दिली. राज्यपाल देवव्रत यांनी संस्कृत भाषेतून शपथ घेतली.

शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपाल देवव्रत यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. आचार्य देवव्रत हे महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल आहेत.

या शपथविधी सोहळ्याला विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, कौशल विकास, उद्योजकता, रोजगार व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, क्रीडा मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (राजशिष्टाचार) मनीषा म्हैसकर व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीला मुख्य सचिव राजेशकुमार यांनी देवव्रत यांच्या नियुक्ती संदर्भातील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेली अधिसूचना वाचून दाखवली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तर सांगता राष्ट्रगीताने झाली. शपथविधीनंतर राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली.

गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

**राज्यपाल देवव्रत यांचा अल्प परिचय :**

नाव : आचार्य देवव्रत, राज्यपाल, गुजरात
वडिलांचे नाव : श्री.लहरी सिंह
जन्मदिनांक : १८ जानेवारी १९५९
पत्ता : राजभवन, सेक्टर–२०, गांधीनगर – ३८२०२०, गुजरात

**शैक्षणिक पात्रता :**

पदवीधर, पदव्युत्तर (इतिहास आणि हिंदी), बी.एड.
योगशास्त्रातील डिप्लोमा
नैसर्गिक चिकित्साशास्त्र व योगिक सायन्समध्ये डॉक्टरेट

**अनुभव :**

अध्यापन व प्रशासन क्षेत्रात ४५ वर्षांचा अनुभव.

१२ ऑगस्ट २०१५ ते २१ जुलै २०१९ या काळात हिमाचल प्रदेशाचे राज्यपाल म्हणून कार्य.

या कालावधीत नैसर्गिक शेती, गोसंवर्धन, बेटी बचाओ–बेटी पढाओ, सामाजिक ऐक्य, व्यसनमुक्ती, वृक्षलागवड व जलसंवर्धन अशा कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली.

२२ जुलै २०१९ पासून गुजरातचे राज्यपाल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गुजरात तसेच इतर राज्यांमध्ये नैसर्गिक शेतीचा मोठ्या प्रमाणात प्रसार. गुजरातमध्येच ५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी रासायनिक शेती सोडून नैसर्गिक शेतीचा स्वीकार केला.


दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी त्यांनी महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेतली.

# निसर्ग कवी ना.धो. महानोर!

मराठी साहित्यातील अनमोल रत्न , निसर्ग कवी ना. धो. महानोर यांची आज जयंती. निसर्गकवी ना धो महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी पळसखेड येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे आईवडील शेतमजूर होते. दुसऱ्याच्या शेतात जाऊन ते राबत असे. ना धो महानोरांना चार भाऊ व तीन बहिणी होत्या. ना धो हे त्यात सर्वात थोरले. त्यांचे प्राथमिक शाळेत गावातच झाले मात्र माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्यांना शेंदुर्णीच्या शाळेत जावे लागले. शेंदुर्णीची शाळा गावापासून दहा बारा किलोमीटर अंतरावर होती.

दहा बारा किलोमीटर पायी चालत जाऊन ते शाळेत जात. शाळेत असतानाच त्यांना कवितेची गोडी लागली. शाळेत असतानाच ते कविता करत. लहानपणापासूनच त्यांना शेत, शिवार, निसर्ग यांची आवड होती त्यामुळे ते त्यावरच कविता करत. लहानपणी लागलेली कवितेची गोडी पुढेही कायम राहिली. मॅट्रिक पास झाल्यावर ते जळगांवला उच्चशिक्षण घेण्यासाठी गेले. तिथे त्यांनी मुळजी जेठा महाविद्यालयात कला शकत प्रवेश घेतला. तिथे त्यांची काव्य प्रतिभा बहरली.

त्यांच्यात असलेली काव्य प्रतिभा ओळखून महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. दुर्दैवाने घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना उच्च शिक्षण अर्ध्यावर सोडून घरी परतावे लागले. घरी आल्यावर ते शेतीत रमले. शेतशिवारात राबतच त्यांनी आपल्या कविता करायला सुरुवात केली. शिक्षण



थांबले पण कविता थांबली नाही. ते शेत शिवारात रमून कविता करू लागले. शेत शिवारात रमणाऱ्या या कवीने आपल्या कवितेतून निसर्गाची अमाप उधळण केली. त्यांच्या अदभुत निसर्ग कवितांनी त्यातल्या रंग गंधानी, नदीच्या प्रवाहासारख्या नाद – लईंनी वाचक रसिकांना वेड लावले. रानात राहणाऱ्या ना धो महानोर सरांच्या कवितेचं केंद्रस्थान होते ते निसर्ग आणि स्त्रिया. निसर्ग



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

आणि स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेल्या कविता वाचकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या.

त्यांची एकूण अकरा कविता संग्रह प्रसिद्ध असून अजिंठा नावाचे खंडकाव्यही प्रकाशित झाले आहे. यादरम्यान त्यांनी गद्य लेखनही सुरू ठेवले. गांधारी ही कादंबरी, गपसप व गावाकडच्या गोष्टी या लोककथा संग्रह, यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, शरद पवार आणि मी, आनंदयोगी पु ल. ही पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी जरी गद्य लेखन विपुल प्रमाणात केले असले तरी त्यांचे पहिले प्रेम कवितेवरच होतं. त्यांनी अनेक चित्रपटांची गाणी देखील लिहिली आहेत. जैत रे जैत चित्रपटातील त्यांची गाणी तर रसिकांच्या ओठावर आजही कायम आहेत. ना धो महानोर सर सहा वर्ष विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी सभागृहात शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते सोडवण्याचा प्रयत्न केले. महानोर सरांना अनेक पुरस्कार मिळाले अगदी पद्मश्री देखील मिळाली मात्र निसर्ग कवी ही रसिकांनी, वाचकांनी त्यांना दिलेली उपाधी ते सर्व पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ मानत. ३ ऑगस्ट २०२३ रोजी निसर्गात रमणारा हा निसर्ग कवी सर्वांना सोडून गेला. ना धो महानोर सर जरी कायमचे निघून गेले असले तरी रसिकांच्या आणि वाचकांच्या मनात ते कायम निसर्ग कवी म्हणूनच स्मरणात राहतील.

त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली आहे. निसर्ग कवी ना. धो. महानोर यांनी आपल्या कवितेतून मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. निसर्ग कवी ना धो महानोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

## लोकशाही..

लोकशाहीधर्मस्थळ
सक्षम विधान भवन
संविधानाचे पावित्र्य
रे जपणूक आजीवन

संतापाच्या उद्रेकात
माते कुणी रणक्रंदन
अ संतोष उसळलेला
प्रदर्शन करे आक्रंदन

कायदा सु व्यवस्थेचे
विध्वंस तोडून बंधन
आव्हान रे व्यवस्थेला
देता उभे सरळ छेदन

निषेध व्यक्त करायचे
असलेकसले निवेदन
सांसदीय मार्ग अनेक
उचीतस्थळी आवेदन

भलेआपला हो तोटा
चुकीचे नको समर्थन
वैयक्तिक लाभास्तव
नको उगा अधःपतन

कसे घडले अघटीत
करावेसूक्ष्मविच्छेदन
ठरु शके घातक पुनः
अपराधा आच्छादन

**– हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यातील शाळा बंद करण्याचा अधिकार शालेय व्यवस्थापन समित्यांना



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन शाळांना सुट्टी देण्याचा अधिकार ग्राम स्तरावरील शालेय व्यवस्थापन समित्यांना प्रदान करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने या संदर्भात आदेश निर्गमित केले. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हाधिकारी हे प्राधिकरणाचे अध्यक्ष असून शासनाच्या परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. जिल्ह्यातील १९ महसूल मंडळांत अतिवृष्टी झालेली असून पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील काही गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच भारतीय हवामान खात्याने जिल्ह्यासाठी अतिवृष्टीचा इशारा दिला आहे.

या पार्श्वभूमीवर १५ व १६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत आवश्यकता असल्यास शाळा बंद ठेवण्याबाबतचा निर्णय शालेय व्यवस्थापन समिती घेऊ शकेल. सर्व मुख्याध्यापकांनी समिती अध्यक्षांसह बैठक घेऊन स्थानिक परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे. तथापि या कालावधीत मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनासंबंधी कामकाज करणे बंधनकारक राहील, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## आगुस्तीन शेंडे याला राज्यस्तरीय पॅरा योगासन स्पर्धेत सुवर्णपदक



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१५, शहापूर (ठाणे) :** महाराष्ट्र पॅरा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन द्वारा आयोजित राज्यस्तरीय योगासन स्पर्धा बालकल्याण संस्था पुणे येथे संपन्न झाली. या स्पर्धेत विविध जिल्ह्यातील संपूर्ण महाराष्ट्रातील एकूण १५० पॅरा योगपटू सहभागी झाले होते. या राज्यस्तरीय पॅरा (दिव्यांग) योगासन क्रीडा स्पर्धेत आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूल अघई, शहापूर जिल्हा ठाणे, येथील इयत्ता नववीतील आगुस्तीन प्रमोद शेंडे हा विद्यार्थी सहभागी झाला होता. परमपूज्य सद्गुरु आत्मा मालिक माऊलींच्या कृपाशीर्वादाने व संत परिवाराच्या प्रेरणेतून या स्पर्धेत सहभागी झालेला आगुस्तीन शेंडे याने उत्कृष्ट कामगिरी करत वयोगट वीस वर्षातील ओ. एच.ए.आर्थोपेडिक अपंग या ग्रुपमधून यांनी सुवर्णपदक मिळवले. मोरार देसाई नॅशनल योग संस्थान नवी दिल्ली येथे दि.२७ व २८ सप्टेंबर २०२५ रोजी होणाऱ्या प्रथम राष्ट्रीय पॅरा योगासन स्पर्धेसाठी देखील त्याची निवड झाली आहे. संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, कार्याध्यक्ष उमेश जाधव, उपाध्यक्ष प्रकाश भट, सचिव अनंत गायकवाड, सदस्य प्रवीण मोरे, सर्व पदाधिकारी, शालेय व्यवस्थापक श्रीलता नायर, व्यवस्थापक सा.प्र. प्रा.उल्हास पाटील, सी.बी.एस.ई. प्राचार्य कैलास थोरात, स्टेट बोर्ड व ज्युनिअर कॉलेज प्राचार्या पौर्णिमा उपासनी, एच.आर.विभाग प्रमुख राहुल जाधव, क्रीडा विभाग प्रमुख पुरुषोत्तम पानबुडे, वसतिगृह विभाग व्यवस्थापक अक्षय बरकले सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आगुस्तीन शेंडे यांचे अभिनंदन करून पुढील होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यासाठी क्रीडा विभाग प्रमुख व योगशिक्षक पुरुषोत्तम पानबुडे व अम्रित कॉलेजचे क्रीडा संचालक महेश जगताप यांनी अथक परिश्रम घेतले.

## श्री शिवाजी विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय बुलडाणा येथे राष्ट्रीय हिंदी दिवस साजरा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, बुलडाणा :** श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय बुलढाणा येथे सोमवार, १५ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय हिंदी दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य श्री.कावरे तसेच प्रमुख पाहुण्यांमध्ये एच.एस.व्ही.सी प्रमुख पंढरीनाथ वाघ, जुनिअर कॉलेज प्रमुख श्री.भोंडे, श्री.मांगे बाबूजी हे उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यांनी हिंदी दिवसाचा महत्व आपल्या मनोगतातून सांगितले. तसेच शाळेचे प्राचार्य श्री.कावरे यांनी अध्यक्षीय भाषणातून हिंदी विषयाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन शाळेची हिंदी शिक्षक निलेश काळ वाघे यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे संचालन भावना भोपळे व आभार प्रदर्शन श्री काळवाघे यांनी केले. कार्यक्रमाचे छायाचित्रण श्री. वाघ यांनी केले. कार्यक्रमाला सर्व शालेय विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## महिलांसाठी स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, लासलगाव (नाशिक) :** बुधवार,दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र निमगाव वाकडा येथे नारी ही संस्कृतीची जननी, नारी हीच जीवनाची शक्ती या उपक्रमांतर्गत महत्त्वाची आरोग्य चळवळ सुरू होत आहे. आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांच्या आरोग्याला एक नवा आयाम मिळणार आहे.

जिल्हा वैद्यकीय अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी आणि वैद्यकीय अधिकारी प्रा आ केंद्र निमगाव वाकडा यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या आरोग्य शिबिरात स्त्रीरोग, बालरोग, नेत्र, दंत शल्यचिकित्सा, समुपदेशक, योग मार्गदर्शक असे सर्व तज्ज्ञ एकाच छताखाली सेवा देतील. मोफत आरोग्य तपासण्या, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि महिलांसाठी खास सेवा या माध्यमातून लासलगाव, विंचूर, पाचोरा, पिंपळगाव नजीक, निमगाव वाकडा येथील महिलांना आरोग्याचा नवा आत्मविश्वास मिळणार असल्याची माहिती निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश पाटील आणि डॉ.वरुणराज ठाकरे यांनी दिली. हा उपक्रम फक्त आरोग्य तपासणी नाही, तर महिलांच्या आत्मसन्मानाचा, विश्वासाचा आणि आरोग्यदायी भविष्यासाठीच्या आशेचा दीपस्तंभ आहे.आयुष्मान कार्ड, वय वंदना योजना, रक्तदान शिबिर आणि आंगणवाड्यांच्या उपक्रमांशी संलग्न सेवा महिलांना नव्या शक्तीची जाणीव करून देतील, असा विश्वास तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुजित कोशिरे यांनी व्यक्त केला.

# पाटणच्या सडेपठारावर फुलोत्सव पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१५, पाटण (सातारा) :** पाटण सह्याद्रीच्या सडेपठारावर जिकडे तिकडे चोहीकडे फुलांचा बहर बहरला...यात पाटण तालुका तरी कसा मागे राहील. निसर्गाने मुक्त हस्ताने केलेल्या विविध रंगांच्या फुलांची उधळण पहाताना कशाला कास..पाटण आहे खास.. अशी स्तुती सुमने पहाणाऱ्यांच्या तोंडून निघणार नाही ते नवल. किल्ले दातेगड वर (सुंदरगड), सडावाघापूर, सडानिनाई, काठी (के.टू.पाईंट) आदींसह डोंगरपठारावर पिवळ्या, जांभळ्या, पांढऱ्या निसर्ग फुलांचा गालिचा पसरला असून सोनेरी रंगाने परिसर न्हाऊन निघाला आहे. याठिकाणच्या अल्हाददायक निसर्गाने पर्यटकांना भुरळ पडली असून येथे पर्यटकांसह निसर्गप्रेमींची पावले आपसुकच वळू लागली आहेत. विशेषतः किल्ले दातेगड पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. ट्रेकर्सच्या माध्यमातून अनेक पर्यटक सुंदरगड व परिसराला भेटी देत आहेत.

साधारणतः ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात पाटण तालुक्यात खऱ्याअथर्थाने निसर्गाचा अद्भुत चमत्कार पाहायला मिळतो. पाटणच्या अगदी जवळ वायव्येस सुमारे तीन मैलाच्या अंतरावर सह्याद्रीच्या अथांग पठारावर निसर्ग सौदर्याचा सानिध्यात सुंदरगड तथा किल्ले घेरादातेगड हा किल्ला आहे. गडावर खडकातील तलवार आकाराची विहीर, महादेव, गणपती व हनुमान मूर्ती, पाण्याच्या टाक्या, घोड्यांचा तबेला, धान्याचे कोठार, भुयारी मार्ग हे पर्यटकांना आकर्षित करत आहे. सध्या हा किल्ला निसर्गातील पाना-फुलांनी बहरलेला आहे.

जुलै ते सप्टेंबर या काळात हा किल्ला मिकी माऊस सारख्या पिवळ्या धमक फुलांनी सजला जातो. ही फुले स्मिथिया कुळातील वनस्पती असून लहान मुलांना आवडणाऱ्या कार्टून मधील मिकी माऊस सारखी दिसतात. या फुलांकडे पाहताक्षणी सोनेरी रंगाचा सुंदरगड असल्याचा घास होतो. अनेक सुंदर कीटक, पक्षी या फुलांभोवती फिरत असताना दिसतात. किल्ल्यावर गेल्यावर य वेगवेगळ्या रंगांच्या फुलांचे दर्शन घडते. या फुलांच्या आगमनाने उपेक्षित सुंदर गडाचे निसर्गसौंदर्य अधिकच खुलून गेले असून या गडावरील अवतरलेल्या फुलामुळे पाटणच्या पर्यटन क्षेत्राला गती मिळू लागली आहे.

याच परिसरातील सडानिनाई, सडावाघापूरच्या कातळ पठारावर पांढऱ्या, निळ्याभोर फुलांचा विशाल गालिचा पसरलेला आढळतो. निळ्या, काळ्या, पिवळ्या रंगांचा विलोभनीय साक्षात्कार सडावाघापूरला पाहता येतो. या पठारावर पाच ते दहा से. मी. देठावर असंख्य छोट्या छोट्या फुलांचा मिळून गुच्छ तयार झालेला दिसतो. त्यामुळे थोड्याशा पाणथळ जागेत इवले इवले चेंडू वाऱ्यावर डोलताना दिसतात.

### सडापठार विविधरंगी फुलांनी बहरला, पर्यटकांची गर्दी

कोयना खोऱ्यातील या परिसरात सच्या वनस्पती अभ्यासक व पर्यटकांना निसर्ग फुलांचा अनोखा रंगोत्सव अनुभवायला मिळत आहे. निसर्गसौंदयनि मुक्त हस्ताने उधळण केलेल्या परिसरातील विविध रंगीबेरंगी फुलांचा अनोखा रंगोत्सव पाहण्यासाठी पर्यटकांची पावले आपोआप या परिसराच्या दिशेने बळू लागली आहेत. ही रंगीबेरंगी फुले मोबाइलसह कॅमेऱ्यात टिपण्यासाठीही फोटोग्राफरांची गर्दी होताना दिसत आहे. सोशल मीडियाच्या जमान्यात युवा पिढीकडून खास रिल्स बनवण्यासाठी ही या ठिकाणी युवक व युवतींची गर्दी होताना दिसत आहे. शेकडोपेक्षा जास्त विविधरंगी फुलांनी पठारी फुलल्याने या परिसराला एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. वारणामाई ट्रेकर्सच्या माध्यमातून एकदिवस किल्ले दातेगड भटकंतीद्वारे सुंदरगडावर सांगली, मिरज, इस्लामपूर, कोल्हापूर मधील शेकडो पर्यटकांनी भेटी देवून पर्यटनाचा आनंद लुटला. यामध्ये सर्वात जास्त महिलांची व लहान मुलांची उपस्थिती होती. निसर्गप्रेमी नीलेश फुटाणे यांनी किल्ले दातेगड परिसराची पर्यटकांना ओळख करून दिली.



### सडेपठारावर ही फुले पहावयास मिळतात

वाकेरी, ढाल तेरडा, मिकी माऊस, गौरूला, घयाळी, तुतारी, काळी मुसळी, गवती दवबिंदू, उंडी चिरायत, कळलावी, जांभळी, निलीमा, तेरडा, अनंतममुळ दुधवेल, समुद्रशोक, केना पुष्प, ड्रॉसेरा, चित्रक, गुढीहवे आमरी, दिवाकंद, बिरंबुळा, हलुंडा, रानमूग, सर्पगंधा, सोनकी, पानगेंद सहाफेटा, डाळफोडी, रान हळद, भारांगी, कंगवा आमरी, पिंडा पंद, जंगली आले, हबे आमरी, गुलाबी भुईचक्र, जांभूळशेंडी, चिरेपापणी, कापू बेरकी, सीतेची वेणी आदीसह विविध जातींची रंगीबेरंगी फुले सडापठारावर पहावयास मिळत आहेत.

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान ठरणार विकसित भारताचा आधार

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, पनवेल :** महिलांचे आरोग्य व सक्षमीकरण हे कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. याच उद्देशाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष राष्ट्रीय अभियान दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १७ सप्टेंबर रोजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व २६ आरोग्य केंद्रांतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिरांचा महापालिका क्षेत्रातील महिलांनी व बालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ इंदौर, मध्य प्रदेश येथेपंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते होणार असून या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण देशभरातील प्रमुख ठिकाणी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील राज्यस्तरीय शुभारंभ सोहळा दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यभर होणार असून राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सेंटर, रंगस्वर सभागृह नरिमन पॉईंट येथे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, राज्यमंत्री आणि मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरात याच दिवशी प्रत्येक जिल्हा व महापालिका स्तरावर महिला व बालकांसाठी विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत.

आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या आरोग्य शिबिराच्या नियोजनासाठी नुकतीच बैठक घेण्यात आली.

या बैठकीस उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी, वैद्यकीय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर उपस्थित होते. स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत १७ सप्टेंबर पासून सुरू होणाऱ्या आरोग्य शिबिरास पालिका कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त महिलांनी व बालकांनी लाभ घ्यावा असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**'स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान' अभियानाची उद्दिष्ट्ये :-**

✻ या अभियानाचा मुख्य उद्देश देशभरातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये महिला आणि मुलांसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिरे आयोजित करणे असा आहे.

✻ या मोहिमेत आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये दररोज (AAM-SHC) तपासणी आणि जनजागृती शिबिरे आयोजित केली जाणार आहे.१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे (AAM-PHC/ UPHC) येथे विशेषज्ञाद्वारे तपासणी शिबिरे घेतली जाणार आहे.

✻ खाजगी महात्मा फुले जनआरोग्य योजना संलग्न रुग्णालये व क्लिनिक येथे देखील विशेषज्ञ आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

**या शिबिरांमध्ये विविध आरोग्य सेवा पुरवल्या जातील, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे :-**

**१) महिलांची आरोग्य तपासणी :-**

✻ उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठी तपासणी करणे.

✻ तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी करणे.

✻ जोखीम असलेल्या महिलांसाठी क्षयरोग (Tuberculosis) तपासणी.

✻ किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी ॲनिमिया (रक्तक्षय) तपासणी आणि समुपदेशन.

✻ आदिवासी भागातील महिलांसाठी सिकल सेल तपासणी कार्ड वाटप आणि आदिवासी भागात सिकल सेल आजाराबाबत समुपदेशन.

**२. माता आणि बाल आरोग्य सेवा :-**

✻ गर्भवती महिलांसाठी प्रसूतिपूर्व काळजी (ANC) तपासणी व समुपदेशन करणे.

✻ हिमोग्लोबिन तपासणी, तसेच पोषण आणि काळजी यावर समुपदेशन.

✻ बालकांचे आवश्यकतेनुसार लसीकरण केले जाईल.

**३. आयुष सेवा :-**

या अंतर्गत आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी, सिद्ध व नॅचरोपॅथी इ. पर्यायी उपचार पद्धतींची सेवा गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**४. जनजागृती आणि वर्तणूक बदल संवाद :-**

✻ किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळीची स्वच्छता आणि पोषणाविषयी जागृती सत्रे आयोजित केली जातील.

✻ महिला बचत गट (SHGs) आणि पंचायत प्रतिनिधींच्या माध्यमातून खाद्यतेल आणि साखरेचा वापर कमी करण्यावर समुपदेशन.

✻ पोषण विषयी समुपदेशन व निरोगी राहण्यासाठी मार्गदर्शन

**५. रक्तदान शिबीरे :-**

✻ १ ऑक्टोबर हा राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिन असून त्याअनुषंगाने राष्ट्रीय महास्वेच्छा रक्तदान या अभियानात राबविण्यात येईल. इंडियन रेड क्रॉस सोसायटी, अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषद इ. संस्थांच्या साहायाने १ लाख युनिट रक्त गोळा करण्याचे ध्येय असून, रक्तदात्यांची नोंदणी करण्याचे प्रस्तावित आहे. My Gov. Portal द्वारे रक्तदान प्रतिज्ञा उपलब्ध करुन देण्यात येईल.

**६. नोंदणी आणि कार्ड वाटप :-**

✻ आयुष्यमान भारत डिजीटल मिशन कार्ड (ABDM), पंतप्रधान जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत नोंदणी व आयुष्यमान वय वंदना कार्ड वाटप सर्व गरजू व पात्र लाभार्थ्यांना करण्यात येईल.

**७. क्षयरोग निर्मुलनासाठी निक्षय मित्र स्वयंसेवकांची नोंदणी :-**

✻ क्षयरुग्णांना दत्तक घेऊन त्यांना पोषक आहार उपलब्ध करुन देण्यासाठी आणि क्षयरोगाविरुध्द जन आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी दानशूर व्यक्ती, संस्था आणि संघटनांना निक्षय मित्र बनवून सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. या करिता माय भारत स्वयंसेवक अथवा इतर स्वयंसेवकाच्या मदतीने निक्षय मित्रांची नोंदणी वाढवण्यात येईल, जेणेकरुन क्षयरोग मुक्त भारताचे ध्येय साध्य करणे शक्य होईल.

✻ तपासणी शिबीरामध्ये (Screening camp) मध्ये आवश्यक असणाऱ्या रुग्णांना विशेषज्ञा कडून तपासणी साठी संदर्भित केले जाईल व त्यांच्या आवश्यक त्या रक्त लघवीच्या तपासण्या सोनोग्राफी, क्षकिरण तपासणी व शस्त्रक्रिया मोफत व नियोजन करुन करण्यात आले आहे.

# हिंदी दिवसानिमित्त सरदार पटेल महाविद्यालयात निबंध स्पर्धा संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी 'हिंदी दिवस' निमित्त मेरा युवा भारत व राष्ट्रीय सेवा योजना चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एम.काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.



या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शरयू पोटनुरवार, प्रमुख अतिथी ॲड.देवा पाचभाई, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, डॉ. कुलदीप आर. गोंड, डॉ.पुरुषोत्तम माहोरे, डॉ.निखिल देशमुख, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या संचालिका डॉ.पुष्पांजली कांबळे, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेत अनेक स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेत प्रबुद्ध गेडाम यांनी प्रथम क्रमांक, वृषाली गेडाम यांनी द्वितीय क्रमांक, तर गौरव झाडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एम.काटकर यांच्या हस्ते सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. दरम्यान सर्वोदय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अरविंद पोरेड्डीवार, कार्याध्यक्ष आ. किशोर जोरगेवार, उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, सगुणाताई तलांडी, सचिव प्रशांत पोटदुखे, सहसचिव डॉ. किर्तीवर्धन दीक्षित, कोषाध्यक्ष संदीप गड्डमवार, सर्वोदय शिक्षण मंडळाचे कार्यकारी सदस्य, राकेश पटेल, सुरेश पोटदुखे, चंद्रशेखर वाडेगावकर, जिनेश पटेल यांनी उपरोक्त उपक्रमाबद्दल शुभेच्छा दिल्या.

# गड - किल्ल्यांच्या रक्षणासाठी खा.लंके यांचे कृतीशील पाऊल

## आपला मावळा संघटनेच्या वतीने विश्रामगडावर स्वच्छता मोहिम



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा केवळ जयघोष नको, तर त्यांच्या गडरक्षणाची जबाबदारीही आपलीच आहे, असा ठाम संदेश खासदार निलेश लंके यांनी नुकताच नाशिक आणि नगर जिल्ह्याच्या सीमेवर अकोले येथील विश्रामगडावरून दिला. आपला मावळा संघटनेच्या माध्यमातून राज्यातील शिवकालीन किल्ल्यांचे जतन आणि स्वछतेसाठी सुरू केलेल्या अनोख्या मोहिमेचा सातवा टप्पा ऐतिहासिक विश्रामगड पट्टा किल्ला येथे हजारो तरूण - तरूणींच्या सहभागातून पार पडला.

या मोहिमेत डॉ.जयश्री थोरात, प्रभावती घोगरे, अकोले तालुका राष्ट्रवादीचे अध्यक्ष सुरेश गडाख, जिल्हा वारकरी संघाचे अध्यक्ष बाळासाहेब भांगरे, प्रदेश सरचिटणीस विनोद हांडे, उमेश डावरे, दत्ता अस्वले, संतोष वारे, आबा पवार, रामेश्वर निमसे, सिताराम काकडे, बाळासाहेब हराळ, नितीन धांडे, मोहिनी काश्मीरी, समीर वडगे यांच्यासह हजारो मावळे सहभागी झाले होते.

शनिवारी सकाळीच फावडे, कुदळ, झाडू हाती घेत आपला मावळा टी शर्ट घातलेले तरुण - तरुणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात किल्ल्याच्या दिशेने रवाना झाले. कचरा निर्मूलन, झाडे - झुडपे काढणे, वृक्षारोपण तसेच पर्यटकांसाठी बाके, डस्टबिन आणि सौर दिवे बसविण्याची कामे उत्साहात पार पडली.

खासदार निलेश लंके यांनी स्वतः हाती झाडू घेत स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. लोकप्रतिनिधी म्हणून टीका - टिप्पणीपेक्षा प्रत्यक्ष कृतीला महत्त्व आहे. असे ते म्हणाले. शिवनेरी किल्ल्यावरून सुरू झालेली ही मोहीम आज धर्मवीर गड, रायरेश्वर, रामशेज, तिकोना, प्रतापगड अशा ठिकाणी राबविली गेली असून आज विश्रामगडावर पोहचली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या वास्तू हे आपल्या इतिहासाचे प्रेरणास्थान आहेत. त्या अखंड राहिल्या पाहिजेत. ही मोहीम त्यासाठीच आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक तरुणाने या उपक्रमात सहभागी होऊन कृती दाखवावी. केवळ व्यासपीठावर भाषण करून टीका करणे थांबवून प्रत्येकाने कामाला लागले पाहिजे अशी अपेक्षा खा.लंके यांनी व्यक्त केली. सरकारकडून गड संवर्धनासाठी निधी मिळावा यासाठी पाठपुरावा करण्याची ग्वाही खा.लंके यांनी बोलताना दिली.

गडांवरील स्वच्छता, मंदिरे दुरुस्ती, सूचना फलक लावणे अशा छोट्या पण परिणामकारक उपक्रमातून भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ, हिरवेगार गड सोडून जाण्याचा संकल्प खा.लंके यांनी व्यक्त केला. चंद्र सूर्य असेपर्यंत छत्रपतींचा विचार प्रत्येक तरुणाच्या मनात जागा करत राहील हीच खरी शिवसेवा असल्याचे त्यांनी सांगितले. शिवप्रेमी युवकांनी आता केवळ घोषणांपुरते न थांबता, गडरक्षणासाठी प्रत्यक्ष कृती करावी हा संदेश विश्रामगड मोहिमेतून महाराष्ट्रभर पोहोचला.

# थोडक्यात

## ठाणे जिल्ह्यात व्होट चोरी विरोधात काँग्रेस स्वाक्षरी मोहीम राबविणार

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१५, शहापूर (ठाणे) :** देशात व राज्यात भारतीय जनता पार्टीने व्होट चोरी करून सत्ता मिळवली असून या विरोधात राहुल गांधी यांनी मतदार अधिकार यात्रा करून जनजागृती केल्यानंतर वोट चोरी विरोधात काँग्रेस पक्षाने स्वाक्षरी मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला असून वोट चोरी विरोधातील दुसरा टप्पा सुरू केला आहे. राज्यात दिनांक १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर पर्यंत वोट चोरी विरोधात स्वाक्षरी मोहीम राबविण्याचे राष्ट्रीय काँग्रेसने आदेश दिले असून, ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील सर्व ब्लॉगमध्ये स्वाक्षरी मोहीम राबवण्यात येणार असल्याचे ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे कळविले आहे. ठाणे ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी प्रसार माध्यमांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या मतदार अधिकार यात्रे नंतर ब्लॉक मंडळ व बूथ स्तरावर जाऊन व्होट चोरी संदर्भात स्वाक्षरी मोहीम राबवली जाणार आहे. ठाणे ग्रामीण अंतर्गत येणाऱ्या सर्व ब्लॉक अध्यक्ष व प्रमुख पदाधिकाऱ्यांना याबाबत सूचना देण्यात आल्या असून बूथ व मंडळ स्तरावर जाऊन मत चोरी विरोधात जनजागृती करून स्वाक्षरी मोहीम राबवली जाणार आहे. सर्व ब्लॉक अध्यक्ष व सर्व आघाडी, विभाग व सेलचे प्रमुख पदाधिकारी जिल्हा, तालुका पदाधिकारी यांनी या मोहिमेत सक्रियपणे काम करून ठाणे ग्रामीण जिल्ह्यातून जास्तीत जास्त लोकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन हे अभियान यशस्वी करावे असे आवाहन काँग्रेस कार्यकर्त्यांना केले आहे. तसेच संविधान व लोकशाहीवर विश्वास असलेल्या नागरिकांनी सुद्धा लोकशाही वाचविण्यासाठी या स्वाक्षरी मोहिमेत मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावे. असे आवाहन ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी केले आहे.

# कुणबी ओबीसींच्या आरक्षणात पुढारलेल्या मराठा जातीची घुसखोरी थांबवा

## महाड- पोलादपूर तहसीलवर विराट मोर्चा



**या सरकारने या अगोदर ५८ लाख मराठ्यांना कुणबी दाखले दिले आहेत, त्याची चौकशी झाली पाहिजे. ०२ सप्टेंबर २०२५ ला जी.आर (GR) आला त्या नंतर लगेच १ लाख १६ हजार मराठ्यांना कुणबी दाखले दिले गेले. ह्याची सुद्धा चौकशी करावी. मराठा व कुणबी ह्या दोन जाती वेगळ्या आहेत. कुणबी हा गरीब भूमिहीन, दुसऱ्याच्या शेतात राबणारा, शेतमजूर तर मराठा हा वतनदार राजकीय अस्तित्व असलेला समाज, आमदार खासदार, साखर कारखानदार, यांच्या मालकीचे. सगे, सोयरे, अधिसूचना मसुदा हा न्यायालयाच्या विरोधात असून सुद्धा त्यांनी कुणबी प्रमाणपत्र मिळविली.**

**३ राष्ट्रीय स्तरावर, ५ राज्य आयोग, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयाने सुधा मराठा हा मागास समाज नाही हे मान्य केलं असून सुद्धा महाराष्ट्र सरकार त्यांना कोणत्या अधिकाऱ्याने कुणबी प्रमाणपत्र देत आहे.**

**- सत्यवान यादव**

**अध्यक्ष कुणबी समाजोन्नती संघ संलग्न, तालुका शाखा महाड-पोलादपूर**

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, महाड (रायगड) :** कुणबी समाजात घुसखोरी करणाऱ्या मराठा समाज व शासन आदेश विरोधात सोमवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबई सह संपूर्ण कोकणात तहसील तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर कुणबी समाजोन्नती संघ मुंबई व इतर सहयोगी संघटना यांच्यावतीने ओबीसी आरक्षण बचाव आक्रोश आंदोलन करण्यात आले. कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संलग्न शाखा तालुका महाड-पोलादपूर वतीने अध्यक्ष सत्यवान यादव यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना महाड-पोलादपूर तहसीलदारांमार्फत निवेदन निवेदन देण्यात आले.

कुणबी ओबीसींच्या आरक्षणात पुढारलेल्या मराठा जातीची प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष घुसखोरी थांबविणे बाबत महाड/पोलादपूर तहसील यांना चार पानी निवेदन देण्यात आले असून निवेदनात म्हटले आहे की

दि.०२ सप्टेंबर २०२५ रोजी हैद्राबाद गॅजेटीअर मधील नोंदी विचारात घेवून मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, कुणबी मराठा किंवा मराठा- कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीबाबत जो शासन निर्णय केला आहे. तो ओबीसींना आरक्षणापासून बेदखल करण्याचा प्रकार आहे. हा निर्णय मूळ कुणबी जातीवर आणि ओबीसींवर अन्याय करणारा आहे. महाराष्ट्रातील कुणबी-ओबीसी (भटके-विमुक्त, बलुतेदार, अलुतेदार, विशेष मागासवर्ग सहित) वेळोवेळी मराठा जातीच्या ओबीसी मधील घुसखोरीला ठाम विरोध करीत आलेले आहेत. दि.०५ मे २०२१ रोजी च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने मराठा समाजाला आरक्षण नाकारले आहे. त्यामुळे पुढारलेला मराठा समाज ओबीसी अर्थात कुणबी जातीमध्ये घुसखोरी करून ओबीसींचे तुटपुंजे २७ टक्के आरक्षणही हिसकावून घेत आहे.

राज्य सरकार मराठा जातीच्या राक्षसी दबावासमोर झुकत आहे. शासनाच्या या पक्षपाती वागणुकीमुळे महाराष्ट्रातील तमाम कुणबी-ओबीसींमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. मराठा आणि कुणबी या दोन स्वतंत्र जाती आहेत. या जातींमध्ये विशेषतः कोकणामध्ये रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत. त्यामुळे एका व्यक्तीच्या दोन जाती असणे हे घटनाबाह्य व नियमबाह्य असल्याचे निवेदनात म्हटले आहे. सरकार मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी शासन निर्णय घेवून मूळच्या कुणबी जातींवर घोर अन्याय करीत असल्याचे निवेदनातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे.

**सदर निवेदनाद्वारे राज्यसरकारकडे तात्काळ कार्यवाहीसाठी पुढील प्रमाणे मागण्या करण्यात आल्या आहेत. -**

* हैद्राबाद गॅझेटीअर मधील नोंदी विचारात घेवून मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबतचा जीआर मागे घेण्यात यावा.

* मराठा समाजाचा कोणत्याही प्रकारे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ओबीसीमध्ये समावेश करण्यात येऊ नये.

* मराठा समाजाच्या कुणबी नोंदी तपासण्यासाठी स्थापन करण्यात आलेली आणि मराठ्यांच्या दबावाखाली पुन्हा मुदतवाढ देण्यात आलेली न्या.संदिप शिंदे समिती ही घटनाबाह्य असून ती तात्काळ बरखास्त करावी.

* दि.०१ जून, २००४ रोजी ओबीसींच्या यादीत अ. क्र. ८३ कुणबी मध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या पोटजातीच्या समावेशाबाबतचा शासन निर्णय तात्काळ रद्द करून त्यांना ओबीसी यादीतून वगळण्यात यावे.

* कुणबी आणि मराठा एक नाहीत. याबाबत ५ मे, २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार राज्य शासनाने मराठ्यांना कुणबी म्हणून ओबीसी आरक्षण देण्यात येवू नये.

* मराठा समाज हा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास नसतानासुध्दा ५८ लाख मराठ्यांना कुणबी नोंदीद्वारे दिले गेलेले बोगस जातीचे दाखले तत्काळ रद्द करण्यात यावेत.

* जात निहाय जनगणना करण्यात यावी.

* शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळास स्वतंत्र दर्जा देवून त्यास पंधराशे कोटी रुपयांची भरीव आर्थिक तरतूद करावी.

* लोकनेते शामराव पेजे न्यासासाठी सरकारने ५० कोटीचा निधी उपलब्ध करून द्यावा.

* पेजे समिती व म्हसकर समितीच्या अहवालातील प्रलंबित मागण्यांची त्वरीत पूर्तता करण्यात यावी.

* कोकणातील बहुसंख्य कुणबी हे गेली अनेक दशके खोतांच्या जमिनी कसत असून सदर जमिनी अजूनही त्यांच्या नावे झालेल्या नाहीत. किंबहुना त्यांची कुळ म्हणून नोंद सुद्धा झालेली नाही. या बेदखल कुळांसंदर्भात आपण ठोस निर्णय घेवून त्यांना न्याय द्यावा.

* मुंबई-गोवा महामार्गाचे काम त्वरीत पूर्ण करून सदर महामार्गाला कोकणच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिलेल्या कोकणचे लोकनेते स्व. शामराव पेजे याचे नाव द्यावे.

* मा. मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या या आधीच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कोकणातील सर्व तालुक्यात कुणबी सांस्कृतिक केंद्र निर्माण करण्याबाबतची कार्यवाही त्वरित करावी.

* सन १९२० साली स्थापन झालेल्या कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई या संस्थेच्या अध्यक्षांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात यावा.

* कोकणच्या चारही जिल्ह्यात (रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे व आताचा पालघर) असलेला कुणबी समाज विविध नावाने ओळखला जातो. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुणबी, तिल्लोरी कुणबी, कुळंबी, कुलवाडी, तर रायगड, ठाणे जिल्ह्यात डोंगर कुणबी, डो. कु., डो. कुणबी, क्षत्रिय कुणबी, ताल्हरे कुणबी, क्षत्रिय कुळंबी या नावाने संबोधिला जातो. या सर्व कुणबी समाजामध्ये रोटी-बेटी व्यवहार अनेक वर्षांपासून चालू आहेत. समाजाचे रीतीरिवाज, धार्मिक विधी हे सामान्यपणे सारखेच आहेत. तरी कुळंबी, कुलवाडी, क्षत्रिय कुणबी, क्षत्रिय कुळंबी, डोंगर कुणबी, डो. कु., ताल्हरे कुणबी या कुणबी जातीचा कुणबी-८३ या मुख्य जातीमध्ये पोटजाती म्हणून समावेश करावा.

* केजी ते पी. जी. पर्यंत मोफत शिक्षण देण्यात यावे.

* नॉन क्रिमिलियर अट रद्द करावी.

* पदोन्नती मध्ये आरक्षण देण्यात यावे आणि रिक्त पदांचा अनुशेष भरण्यात यावा.

* SC. ST. ला लागू असलेली शेतकी आणि शैक्षणिक शासकीय योजना जइउ ना लागू कराव्यात.

* कोकणातील सर्व जिल्ह्यांमध्ये ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह तात्काळ सुरू करण्यात यावीत.

* महाज्योतीचे विभागीय कार्यालय मध्यवर्ती ठिकाणी ठाणे येथे सुरू करण्यात यावे

* मुंबईस्थित कोकणातील ओबीसी बांधवांना म्हाडामार्फत बांधून देण्यात येणाऱ्या घरकुल योजनेत आरक्षण लागू करावे.

* महाराष्ट्र शासनाने जानेवारी २००१ मध्ये मुंबई कुलवहिवाट १९४८ च्या ६७ चे ४ मध्ये दुरुस्ती केली आहे. त्यामध्ये रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याचा समावेश केला आहे. परंतु रायगड जिल्ह्यांत देखील बेदखल कुळांची संख्या अधिक असल्याने मुंबई कुलवहिवाट १९४८ चे ६७ च्या ४ मध्ये रायगड जिल्ह्याचा समावेश करण्यात यावा.

अशा विविध मागण्या गेल्या कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहेत. ओबीसींचे अनेक शैक्षणिक, नोकरी विषयक व स्वयंरोजगार विषयक गंभीर प्रश्न याकडे राज्य सरकार दुर्दैवाने दुर्लक्ष करीत आहे. उपरोक्त मागण्यांवर राज्यशासनाने येत्या १५ दिवसांत निर्णय न घेतल्यास संघटनेच्या वतीने अखंड कोकणामध्ये तीव्र आंदोलन उभारले जाईल असा निवेदनात राज्य सरकारला इशारा देण्यात आला आहे. सोबत सचिव मंगेश हुमने, मुंबई सह सचिव संजय उमासरे,युवा अध्यक्ष विशाल गोलंबडे, ग्रामीण अध्यक्ष प्रदीप लोखंडे, सह सचिव समीर रेवाळे. सर्व ग्रामीण गट अध्यक्ष, ग्रामीण सचिव, मध्यवर्ती मंडळाचे सर्व कार्यकारी मंडळ बहुसंख्य कुणबी बांधव, महिलावर्ग ह्या मोर्चा निवेदनासाठी हजर होते. यावेळी मराठा समाजाच्या ओबीसी मध्ये होत असलेल्या घुसखोरी विरुद्ध जोरदार घोषणा देण्यात आल्या.

## पाटण विधानसभा निवडणूक काळातील कामाचे बिल न मिळाल्याने चाऊस यांचे आमरण उपोषण

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१५, पाटण (सातारा) :** पाटण विधानसभा निवडणूक २०२४ साठी मंडप, स्पीकर, साऊंड या कामासाठी पाटण येथील अब्दुल सलीम चाऊस यांच्या चाऊस मंडप डेकोरेटर्स यांची सब टेंडर म्हणून नेमणूक करण्यात आली होती. सदर काम त्यांनी निवडणूक काळात चोख व चांगल्या पद्धतीने केले होते. निवडणूक होऊन एक वर्षाचा कालावधी होत आला असताना देखील या कामाचे भाडेतत्त्वावर असणारे बिल अद्याप मिळालेले नाही. या बिलासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी पाटण व सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसिलदार पाटण यांच्याकडे वेळोवेळी वर्षभर हेलपाटे मारुन कामाचे पैसे मिळालेले नाहीत. प्रत्येकवेळी वेगवेगळे कारण सांगून वेळ मारुन नेत आहेत. यामुळे झालेल्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून पाटण येथे आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा चाऊस मंडप डेकोरेटर्सचे मालक अब्दुल सलीम चाऊस यांनी निवेदनाद्वारे प्रांताधिकारी, तहसिलदार व उपविभागीय पोलीस अधिकारी पाटण यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनात त्यांनी पुढे म्हणले आहे. पाटण विधानसभा निवडणूक कामासाठी पाटण तहसील ऑफिस साठी माझी सब टेंडर म्हणून नेमणूक करण्यात आली होती. व ते काम मी बिनचूक व चांगल्या पद्धतीचे करून दिले आहे. काम करून जवळपास एक वर्ष पूर्ण होण्यास आले आहे. तरी बिल मंजूर झाले नाही. या बिलासाठी प्रांताधिकारी पाटण व तहसिलदार पाटण यांच्याकडे दररोज हेलपाटे घालून मी कंटाळलो आहे. या दोन्ही अधिकारी यांच्याकडून माझ्या बिलासाठी उडवा उडवीचे उत्तरे देत आहेत. व प्रत्येक वेळी वेगवेगळे कारण सांगत आहेत. विधानसभा निवडणूक काळात मी केलेल्या कामाचे बिल न मिळाल्याने माझ्या परिवारावर उपासमारीची वेळ आली आहे. निवडणूक काळातील काम पार पाडण्यासाठी मी इतर ओळखीच्या लोकांकडून उसने पैसे घेतले आहेत. दुकानदारांकडून उदार साहित्य आणले आहे व त्यांच्या तागाद्यामुळे मला मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. मला बीपी व शुगर चा शारीरिक त्रास असल्याकारणाने मला मानसिक त्रास सहन होत नाही. या काळजीने माझ्या वडिलांना हृदयविकाराचा आजार झाला आहे. हे सुद्धा मी तहसीलदार व प्रांत साहेबांना सांगितले आहे. तरी माझे बिल लवकरात लवकर काढण्यात यावे. या कारणाकरिता मी अमरण उपोषण करत आहे. मला बीपी व शुगर चा त्रास आहे. उपोषण दरम्यानात माझ्या जीवास काही झाल्यास त्यास प्रांताधिकारी व तहसीलदार जबाबदार राहतील. असे निवेदनात म्हटले आहे.

## शिवकुमार हरडे ग्यान गौरव पुरस्काराने सन्मानित




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१४, नागपूर :** ऑल इंडिया कौन्सिल फॉर प्रोफेशनल एक्सीलेंस या शिक्षण क्षेत्रातील नामवंत संस्थेतर्फे दरवर्षी दिला जाणारा यावर्षीचा इंडिया एज्युकेशन अवार्ड-२०२५ ग्यान गौरव पुरस्कार यंदा नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील खापरखेडा गावातील एस.के. कॉम्प्युटर क्लासेसला नुकताच बहाल करण्यात आलेला आहे. पुरस्कार सोहळा दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी नागपूर येथील नैवेद्यम हॉटेल येथे संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कविता ताओरी, संचालक शरद ताओरी यांच्या प्रमुख उपस्थितीत व सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री व मिस इंडिया सायली भगत यांच्या हस्ते एस. के. कॉम्प्युटर क्लासेसचे संचालक व प्राचार्य शिवकुमार संतोष हरडे यांना शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन ग्यान गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १४ सप्टेंबर रोजी भारताच्या संगणक शिक्षण क्षेत्रात एक नवा इतिहास रचला गेला. खापरखेडा येथील एस.के.कॉम्प्युटर क्लासेसचे संचालक व प्राचार्य शिवकुमार हरडे यांनी आपल्या कॉम्प्युटर क्लासेसच्या माध्यमातून परिसरातील विद्यार्थ्यांना चांगले आणि दर्जेदार शिक्षणा सोबत चांगले जीवन देण्याच्या प्रयत्न केला. एस.के.कॉम्प्युटर क्लासेस ने खापरखेडा गावाचे नाव फक्त नागपुरातच नव्हे तर संपूर्ण देशात ग्यान गौरव हा पुरस्कार प्राप्त करून उंच केलेलं आहे.

ऑल इंडिया कौन्सिलर फॉर प्रोफेशनल एक्सीलेंस ही संस्था अखिल भारतीय स्तरावर संगणक क्षेत्राततील एक अतिशय लोकप्रिय संस्था असून या संस्थेचे संपूर्ण भारतात ३५०० पेक्षा अधिक संगणक केंद्र कार्यरत आहे. त्यामुळे ही संस्था संगणक क्षेत्रातील सर्वोत्तम मानली जाते. या संस्थेच्या वतीने दरवर्षी इंडिया एज्युकेशन अवार्ड देवून चांगल्या उत्कृष्ट संगणक संस्थेला सन्मानित करीत असतात. यंदाचा नामवंत ग्यान गौरव पुरस्कार खापरखेडा येथील एस. के. कॉम्प्युटर क्लासेसला मिळाल्याबद्दल परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांना पुढील भविष्यासाठी परिसरातील विश्व हिंदू परिषद, बजरंग दल तसेच ग्रामस्थांनी शुभेच्छा दिल्या आहेत.